# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र. 245/2022   दिनांक : 20.06.2022

## 1)जबरी चोरी :–

**रामतिर्थ :–**दिनांक 19.06.2022 रोजी 01.30 वा. चे सुमारास, **नरसी ते देगलुर रोडवर कुंचोली फाटयाजवळ ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व नातेवाईक मुलाबाळांसह मॅक्स गाडी नं. एम.एच./26–एल–1035 मध्ये बसून नांदेड ते देगलुर जाताना कुंचेली फाटयाजवळ अनोळखी चार आरोपीतांनी संगणमत करुन रोडवर जॅक ठेवून रोड कडेला लपून बसुन फिर्यादीने ते जॅक घेण्यासाठी गेला असता त्यास लोखंडी रॉड ने पी.यु.सी. पाईन दगडाने मारुन जखमी करुन फिर्यादीचे पुतण्या जवळील नगदी, पत्नी व भावजयीचे सोने व 6 मोबाईल असा एकुण किंमती 1,66,400/–रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी जमील खान अहमद खान पठाण, वय 35 वर्षे, व्यवसाय पंम्पचेर दुकान रा. खानापुर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 96/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री व्ही.डी. जाधव, मो.क्रं. 9765902710** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 18.06.2022 रोजी 24.00 वा. ते दिनांक 19.06.2022 रोजी 06.00 वा. चे दरम्यान, **अमरसिंग दखने यांचे शेतात पांगरी विष्णुपुरी, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा अमरसिंग दखने यांचे शेतात पांगरी विष्णुपुरी येथे सालगडी म्हणुन काम करुन घरालगत बाहेर असलेल्या पोल्ट्री फॉमचे शेतामध्ये झोपी गेला असता त्याचे घराचा कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण 60,000/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी दत्ता गोविंदराव कदम, वय 40 वर्षे, व्यवसाय सालदार रा. डेरला ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 364/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2434 कऱ्हाळे, मो.क्रं. 9309737394** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**शिवाजीनगर :–** दिनांक 19.06.2022 रोजी 02.30 वा. ते 05.30 वा. चे दरम्यान, **मगनपुरा, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा के.टी.एम. कंपणीची मो. सा. किमती 1,50,,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी हर्षित हनुमानदास जाजू, वय 23 वर्षे, रा. मगनपुरा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 235/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो.क्र. 9527988931** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**हिमायतनगर :–**दिनांक 17.06.2022 रोजी ते दिनांक 18.06.2022 रोजी 13.00 वा. चे दरम्यान, **वलीसेठ यांच्या शेतात हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे रेल्वेचे ईलेक्ट्रिकलचे दोन पोल वलीशेठ यांचे शेतात ठेवलेले किंमती 50,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेल्याचे लक्षात आल्याने हिमायतनगर येथील यातील नमुद आरोपी याचे भंगार दुकानात पाहिले असता सदरचे रेल्वेचे दोन लोखंडी पोल दिसुन आल्याने व तो उडवा उडवीचे उत्तरे देवू लागल्याने त्याचे विरुध्द गुन्हा दाखल केला. वगैरे **फिर्यादी बनविर सिंग उमेशचंद, वय 31 वर्षे, व्यवसाय सुपर वायझर रा. हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 143/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री महाजन, मो.क्र. 8689707038** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**लोहा :–**दिनांक 09.06.2022 रोजी 20.30 वा. चे सुमारास, **महादेव मंदीराजवळ इंदिरानगर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमा करुन फिर्यादीहा त्याचे पाहुण्यांना घरी सोडण्यासाठी जात असताना तू आमची मावशी हिचे कंदुरीला का गेलास असे म्हणुन फायटर ने तोंडावर मारुन ओठास व दातावर मारल्याने दोन दात खुडले व डाव्या डोळयावर मारुन जखमी केले. तसेच लाकडाने,लाथाबुक्याने मारहाण करुन गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मारोती व्यंकटी शेळके, वय 37 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. इंदिरानगर लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 129/2022 कलम 325,324,143,147,148,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोह/1754 के.जे. सुर्यवंशी, मो. नं. 7057524134** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.08.2020 ते दिनांक 09.03.2022 पर्यंत, **सासरी अर्धापुर ह.मु. रहिमपुर ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु दिसायला चांगली नाहिस व मला सेंट्रींगचे सामान घ्यायचे आहे तुझ्या वडीलांची शेती विकुन तुझ्या हिस्याला येणारे दोन लाख रुपये घेवुन ये असे म्हणुन फिर्यादी व तिच्या मुलांना मारहाण करुन शिवीगाळ करुन शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 23 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 365/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1912 तिडके, मो.क्रं. 9421394862** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**सिंदखेड :–** दिनांक 18.06.2022 रोजी 18.50 वा. चे सुमारास, **पालाईगुडा फाटा ते गोंडवड सागावाचे दरम्यान जाणारे रोडवर ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **पुतण्या मयत गणेश भिमराव कुसराम वय 40 वर्षे रा. अंजनखेड ता. माहुर जि. नांदेड** हे मोटार सायकलने जात असतांना यातील आरोपी ट्रॅक्टर क्र. एमएच/26–ई–6643 चा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास समोरुन जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. व साक्षीदार यास जखमी केले. वगैरे **फिर्यादी यादव मारोती कुसराम वय 55 वर्षे व्यवसाय शेतमजुरी रा. अंजनखेड ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं. 79/2022 कलम 304(अ),279,338 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री भोपळे, मो.क्र. 9423926150** हे करीत आहेत.

## 8)विज पडुन मृत्यु :–

**देगलुर :–**दिनांक 18.06.2022 रोजी 05.00 वा. चे सुमारास, **लख्खा शिवार ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे विठ्ठल शंकरराव भाले, वय 40** वर्षे, **रा. वन्नाळी ता. देगलुर जि. नांदेड**, हा लख्खा शिवारात पेरणी करण्याकरीता गेला असता आकाशातुन विज पडुन मरण पावला आहे. वगैरे **खबर देणार नारायण लक्ष्मण भाले, वय 32** वर्षे, **व्यवसाय शेती रा. वन्नाळी ता. देगलुर जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे देगलुर** आ. मृ. **15**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2462 केंद्रे, मो.नं. 9821159844** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड